महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

वर्ष : - १ ले अंक :- ०७ रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४ पान :- ४ किंमत ५ रु. जळगाव

## नेहरूंपासून आतापर्यंतच्या काँग्रेसने बाबासाहेबांचा अपमान केला अकोल्यातून पंतप्रधानांचा काँग्रेसवर निशाणा

अकोला- राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारसभा सुरु आहेत. त्यातच आज अकोल्यात महायुतीची प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती. या प्रचार सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी त्यांनी काँग्रेसच्या आजपर्यंतच्या कारभारावर बोट ठेवत त्यांच्यावर सडकून टीका केली.

काँग्रेसने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वारंवार अपमान केला. नेहरूंपासून आतापर्यंतच्या कांग्रेस नेतृत्वाने बाबासाहेबांचा वारंवार अपमान केलाय. त्यांचं योगदान काँग्रेसने नाकारलंय. काँग्रेसचे लोक बाबासाहेबांचा अपमान करतात, त्यांची संविधान निर्माता ही ओळख काँग्रेसला खुपते, कारण ते दलित मातेचे सुपूत्र होते.

मात्र महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार माझ्यासाठी सदा-सर्वदा पूजनीय आहेत आणि राहतील. आम्ही देशभरात त्यांची स्मारकं उभारली. मी अकोल्यातून काँग्रेसच्या शाही परिवाराला आव्हान देतो की त्यांनी बाबासाहेबांच्या पंचतिर्थाला वंदन केलं हे सिद्ध करावं. असे थेट आव्हान देत अकोल्याच्या सभेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर घणाघाती टीका केली आहे.

काँग्रेस मजबूत झाली तर देश मजबूर होईल. काँग्रेस दलित, आदिवासी आणि ओबीसींची



प्रगती पाहू शकत नाही. कांग्रेस दलितांमधील जातीजातीत भांडणं लावत आहे आणि हिच चाल आणि चरित्र काँग्रेसचे आहे, असेही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले.'एक है तो,सेफ है असे म्हणत हरियाणात काँग्रेसचे मनसुबे उधळून लावलेत. जम्मू काश्मीर विधानसभेत काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी कलम ३७० लागू करण्याचा प्रस्ताव पुन्हा मंजूर केला.

मात्र तुम्हाला वाटतं का असं व्हावं? दहशतवादी संघटना, पाकिस्तानने हे कलम हटविण्याचा विरोध केला होता. काँग्रेस तिच भाषा बोलतेय. ३७० लागू केलं तर काश्मीरमध्ये बाबासाहेबांचं संनिधान संपुष्टात येईल.दरम्यान, कोऱ्या पानांचं संविधान पुस्तक घेऊन फिरणारे लोक पापी आहेत, असे म्हणत मोदींनी राहूल गांधींना अप्रत्यक्षपणे टोला लागवला आहे.३७० हटवल्यानंतर जम्मू आणि काश्मिरमधल्या आदिवासी, दलितांना आरक्षण मिळालं होतं. २० नोव्हेंबरला महाराष्ट्राला नवी दिशा द्यायची आहे. महायुतीच्या उमेदवारांना बहूमताने जिंकवा. काल दोन सभा आणि आजची सभेतील गर्दी ही विजयाचा विश्वास देणारी आहे. असा विश्वासही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अकोल्याच्या सभेतून व्यक्त केला घरी.

नरेंद्र मोदींना हटवू पाहणाऱ्याला आम्ही मिटवल्याशिवाय राहणार नाही. ३७० कलम हटविण्याचा निर्णय क्रांतीकारी आहे. नॅशनल कॉन्फरन्स, काँग्रेसला काश्मिरमध्ये परत ३७० कलम आणायचे आहे. या देशाचे संविधान कुणीच बदलवू शकत नाही. राहुल गांधी संविधानाचे पुस्तक दाखवत ते संविधान बदलायच्या गोष्टी करतात. मात्र नरेंद्र मोदी बाबासाहेब आंबेडकरांशी एकनिष्ठ आहेत. असेही रामदास आठवले म्हणाले.

## पाकिस्तानच्या क्वेटा रेल्वे स्थानकावर भीषण बॉम्बस्फोट, २१ लोकांचा मृत्यू

नवी दिल्ली- पाकिस्तानच्या बलुचिस्तान येथे क्वेटा रेल्वे स्थानकावर शनिवारी (दि. ९ नोव्हेंबर) भीषण बॉम्बस्फोट झाला असून यात २१ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. तर ४६ जण गंभीर जखमी असल्याचे सांगितले जाते. प्राथमिक तपासानुसार ही घटना आत्मघातकी स्पोटाची असल्याचा अंदाज क्वेटाचे पोलीस अधीक्षक मोहम्मद बलोचवस यांनी पीटीआयशी बोलताना व्यक्त केला. बलोच लिबरेशन आर्मी यांनी या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे.

क्वेटा रेल्वे स्थानकाच्या तिकीट बुकिंग कार्यालयाजवळ बॉम्बस्फोट झाल्याची माहिती मिळत आहे. पेशावरला जाणाऱ्या जाफर एक्सप्रेस ट्रेनमध्ये बसण्यासाठी अनेक प्रवाशी प्लॅटफॉर्मवर एकत्र जमले होते, त्यावेळीच हा बॉम्बस्फोट झाला. पोलीस अधीक्षकांनी सांगितले की, मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो. घटनास्थळाचा व्हिडीओ पाहिल्यानंतर ते म्हणाले की, इथे शेकडो लोक उपस्थित होते. या स्फोटामुळे प्लॅटफॉर्मच्या छताचेही नुकसान झाले आहे.

शनिवारी सकाळी बॉम्बस्फोट झाल्यानंतर बचाव कार्य आणि तपास सुरू करण्यात आला



आहे. बलुचिस्तान प्रांताचे सरकारी प्रवक्ते शाहिद रिंद यांनी सांगितले की, आम्ही बॉम्बस्फोट झाला त्या ठिकाणाहून सामान्य नागरिकांना बाजूला केले आहे. तसेच मृत्यू झालेल्या नागरिकांचे मृतदेह आणि जखमी लोकांना क्वेटाच्या शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांनी या हल्ल्याचा निषेध व्यक्त केला आहे. सामान्य माणसांना लक्ष्य करणाऱ्या या भ्याड हल्ल्याचा आम्ही निषेध करतो आणि हल्ल्यामागचे सूत्रधार शोधून त्यांना कठोर शासन करण्याचा शब्द देतो. गेल्या काही काळापासून सामान्य नागरिक, मजूर, महिला आणि मुलांना अतिरेकी लक्ष्य करत आहेत. या हल्ल्यामागे असलेल्यांना सोडले जाणार नाही.

## खळबळजनक ! भाजपचे उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुधाकर खाडे यांची कुऱ्हाडीने वार करून हत्या

मुंबई-राज्यात एकीकडे निवडणुकीचे वातावरण असताना दुसरीकडे सांगलीमधून धक्कादायक घटना समोर आली आहे. सांगलीतील मनसेचे माजी जिल्हाप्रमुख सुधाकर खाडेंची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेनंतर आता सांगलीत आता राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार मिरज-पंढरपूर रस्त्यावर ही घटना घडली होती. प्राथमिक माहितीनुसार, मालमत्तेच्या कारणातून ही हत्या झाली असल्याचे सांगण्यात येत आहे. सध्या सुधाकर खाडे हे भाजपच्या स्टार्टअप इंडियाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष होते.



२०१४ मध्ये त्यांनी तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवली होती. सध्या खाडे भाजपच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष होते.

**पोलिसांकडून एकाला अटक**

या प्रकरणाशी निगडित पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले आहे. शनिवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पंढरपूर रोड येथील राम मंदिराजवळ असलेल्या जागेत प्रॉपर्टीच्या कारणावरून खाडे यांचा एका व्यक्तीसोबत वाद झाला होता. याच वादातून संशयित व्यक्तीने खाडे यांच्या मानेवर कुऱ्हाडीने वार केले. यातच खाडे यांचा मृत्यू झाला. कुऱ्हाडीने वार केल्यानंतर खाडे यांना जखमी अवस्थेत मिरजेतील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

परंतु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ते मृत असल्याचे घोषित केले. सदर घटनेबाबत घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून याबाबत एका संशयीताला ताब्यात घेण्यात आले आहे. याबाबतचा पुढील तपास महात्मा गांधी चौक पोलीस करीत आहेत.

## महायुतीला जिंकवण्यासाठी पोलीस व गुंडांच्या बैठका, राऊतांचे आरोप; यादी देण्यास तयार, वरिष्ठ अधिकाऱ्याला म्हणाले, सरकार बदलल्यावर!

मुंबई- शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी आरोप केला आहे की राज्यातील पोलीस हे गुडांच्या टोळ्यांबरोबर मिळून महायुतीसाठी काम करत आहेत. मात्र सरकार बदलल्यावर या सर्वांचा हिशेब केला जाईल. राऊत म्हणाले, भाजपा व मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसाठी मुंबईतील अनेक मतदारसंघांत ठाणे व पुण्यातील अनेक कुप्रसिद्ध गुन्हेगार काम करत आहेत. कधीकाळी अंडरवर्ल्डच्या टोळ्यांमध्ये सहभागी असलेले लोक भाजपा व शिंदेंसाठी निवडणुकीचं काम करत आहेत. राजकीय पक्ष वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये निरीक्षकांची नेमणूक करतात, त्याचप्रमाणे भाजपा व शिंदेंच्या पक्षाने अनेक विधानसभा मतदारसंघात गुंडांच्या टोळ्या नेमल्या आहेत. आपले संपर्कप्रमुख असतात तसे त्यांनी गुंडांच्या टोळ्यांचे म्होरके नेमले आहेत. कांजूरमार्ग, विक्रोळी, भांडुप, मुलुंड, दादर, ठाणे, कोपरी-पाचपाखाडी, ठाणे शहर, कलिना, कुर्ला भागात हे गुंड व त्यांच्या टोळ्या निवडणुकीचं काम करत आहेत. त्यासाठी त्यांना जामिनावर सोडवून आणलं आहे, तसेच त्यांना भाजपा व शिवसेनेत (शिंदे) प्रवेश दिला आहे.

संजय राऊत म्हणाले, वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि गुंडांच्या बैठका होतात.

वरिष्ठ पोलीस अधिकारी,



आयपीएस दर्जाचे अधिकारी व या गुंडांच्या विविध मतदारसंघांत बैठका होत आहेत. निवडणुका जिंकून देण्यासाठी रात्री बैठका होतात. आम्ही निवडणूक आयोगला यासंदर्भात माहिती देणार आहोत. हे पोलीस महाविकास आघाडीला मदत करणारे कार्यकर्ते, तसेच ज्यांच्यावर राजकीय गुन्हे आहेत त्यांना तडीपार करतात. त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करायचे, त्यांच्याकडे पोलिसांना पाठवायचं, त्यांच्या घरी किंवा गावी कोण आहे याचा शोध घ्यायचा, त्यांना धमक्या द्यायच्या, असे सगळे पराक्रम चालू आहेत.शिवसेना (ठाकरे) खासदार म्हणाले, कायदा व सुव्यवस्था सांभाळणाऱ्या प्रमुख पोलीस अधिकाऱ्यांना माझं आव्हान आहे की तुम्ही एक गोष्ट लक्षात घ्या, सरकार बदलत असतं, सरकार जातं, येतं. गुडांच्या मदतीने तुम्ही ज्या कोणाला मदत करू इच्छिता त्यांचेही दिवस फिरतील. तुम्ही पोलीस खात्याला कलंक लावत आहात. मुंबई आणि महाराष्ट्राचं पोलीस खातं तुम्ही बेआब्रू करत आहात. सत्यनारायण चौधरी, तुम्ही कायदा व सुव्यवस्था विभागाचे प्रमुख आहात, मात्र, तुमच्यासमोर काय जळतंय ते पाहा, आम्हाला जास्त बोलायला लावू नका. सरकार बदलत आहे हे लक्षात घ्या. सर्वांचा हिशेब केला जाईल. माझ्याकडे यादी मागितली तर मी गुंडांची यादी द्यायला तयार आहे. कोणत्या अधिकाऱ्याच्या कोणत्या गुंडाबरोबर बैठका होतायत, वर्षा बंगल्यावरून कोणत्या सूचना दिल्या जातायत ते मी सांगू शकतो. सत्यनारायण चौधरी कोणासाठी काम करतायत त्यांची नावं मी देऊ का? मला धमक्या देऊ नका, एवढंच सांगतो.

## ऑनलाइन नोकरीची ऑफर देत तरुणाला ४ लाखाचा गंडा

जळगाव-जळगाव जिल्ह्यात ऑनलाईन फसवणुकीच्या घटना वाढत आहेत. ऑनलाईन जॉबची ऑफर देऊन वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या राहुल कृष्णा चौधरी (वय २६) या तरुणाला सायबर गुन्हेगारांनी तब्बल ४ लाख ७२ हजार रूपयांचा चुना घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी जिल्हापेठ पोलिस ठाण्यात ठगबाजांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव शहरातील जिल्हा परिषद कॉलनीत वास्तव्यास असणारे राहुल कृष्णा चौधरी वैद्यकीय शिक्षण घेत आहे. त्यांना ७ ऑक्टोबरला टेलिग्रामवर एक मेसेज आला. त्यावर रमा लक्ष्मी नावाच्या व्यक्तीने मी प्राइस रनर कंपनीतून बोलत असल्याचे सांगून चांगल्या कमाईचे ऑनलाइन जॉब पाहिजे असल्यास संपर्क साधण्याचे सांगितले. या मेसेजकडे राहुलने दुर्लक्ष केले. मात्र ११ ऑक्टोबरला पुन्हा त्याला हा मेसेज पाठविण्यात आला. यात जॉबवर ऑफर असून आठ हजारातच कामाला सुरूवात करता येईल, असे आमिष देत दिले त्यानंतर राहुलने ऑनलाइन पैसे भरले.

दरम्यान यानंतर दुसरी योजना सांगत नव्या सापळ्यात ओढले. यात लक्झरी प्रोडक्ट मिळाले असून ते मिळविण्यासाठी १५ हजार रूपये भरावयास सांगितले. ही रक्कम देखील त्यांनी भरल्यानंतर ठगांनी राहुल यांचा विश्वास संपादन करण्यासाठी ९ हजार ८०० रूपये त्यांच्या खात्यावर पाठविले. नंतर १९ ऑक्टोबरला पुन्हा मेसेज पाठवत आमच्या वेबसाइटवर तुमच्यासाठी आणखी ऑफर आहे. म्हणून ३० हजार रूपये भरावे लागतील असे सांगितल्यावर राहुल याने पुन्हा ३० हजार रूपये भरून ऑनलाइन कामाला सुरूवात केली. असे करत वेळोवेळी एकूण ४ लाख ७२ हजार रूपयांची रक्कम राहुल याने पाठविली.

ती रक्कम काढण्यासाठी त्यांच्याकडे अडीच लाख रूपयांची मागणी केल्याने फसवणूक झाल्याचे राहुलच्या लक्षात आले. यामुळे त्याने पैसे परत मागितले असता समोरच्याने पैसे परत न केल्याने चौधरी यांनी जिल्हापेठ पोलिसात तक्रार देत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक महेंद्र पाटील तपास करीत आहेत.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुण ठार, एक गंभीर जखमी

जामनेर -तालुक्यातील ओझर गावात राहणाऱ्या दोन तरुणांचा दुर्दैवी अपघात झाला असून, एका अज्ञात वाहनाच्या धडकेत त्यापैकी एक तरुण जागीच ठार झाला, तर दुसरा गंभीर जखमी आहे. ही घटना काल रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.




प्राप्त माहितीनुसार, ओझर गावातील रामू विठ्ठल सोनवणे (वय १९) आणि विष्णू रघुनाथ मोरे (वय १७) हे दोघे काही कामानिमित्त बोदवड येथे जात होते. मोटारसायकलवरून प्रवास करत असताना माल दाभाडी गावाजवळ अचानक एका अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत विष्णू रघुनाथ मोरे जागेवरच ठार झाला, तर मोटारसायकल चालवत असलेला रामू विठ्ठल सोनवणे गंभीर जखमी झाला आहे.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व जखमी रामूला तातडीने उपचारासाठी जळगाव जिल्हा रुग्णालयात हलवले. सध्या रामूवर रुग्णालयात उपचार सुरू असून, त्याची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे ओझर गावात शोककळा पसरली आहे. विष्णूच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून, त्याच्या अकाली मृत्यूने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी अज्ञात वाहन आणि चालकाचा शोध घेण्यासाठी तपास सुरू केला आहे.

## धुळ्यात तब्बल ५ कोटी ६३ लाखाचा गांजा जप्त

धुळे : धुळ्यातील शिरपूर तालुक्यातील गांजाची शेती गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने (एएनसी) कारवाई करत उद्ध्वस्त केली आहे. या कारवाईत ५ कोटी ६३ लाख किंमतीचे २ हजार ८१६ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे.

एएनसीच्या वांद्रे कक्षाने ही कारवाई केली आहे.

गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार, १५ ऑगस्ट रोजी अवैधपणे गांजा विक्री करणा-या एका आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ४७ किलो ग्रॅम वजनाचा गांजा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपीला अटक करत तपास सुरू करण्यात आला. आरोपीच्या चौकशीत धुळ्यातील आरोपीकडून गांजा घेतल्याचे समोर



आले. त्यानुसार, गुन्हे शाखेने धुळ्यात मोर्चा वळवला. तेव्हा, किरण कोळी नावाच्या आरोपीने येथे गांजाची लागवड केल्याचे समोर आले.

कोळी याने धुळ्यातील शिरपूर तालुक्यातील भोईटी शिवारात दोन एकरमध्ये शेतीची लागवड केल्याचे समोर आले. त्यानुसार, गुन्हे शाखेने येथील शेत उद्ध्वस्त करत २७७४ किलो वजनाच्या गांजाची झाडे तसेच ४२ किलो वजनाचा सुका गांजा असा एकूण २८१६ किलो वजनाचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी गुन्हे शाखा अधिक तपास करत आहे.


## सुप्रिया सुळेंनी मागितली आर आर पाटलांच्या कुटुंबियांची माफी; अजित पवार म्हणाले, सगळी नौटंकी आहे

तासगाव-तासगाव येथे झालेल्या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ७० कोटींच्या सिंचन घोटाळ्याबाबत बोलताना माजी गृहमंत्री आर आर पाटील यांच्याबाबत केलेल्या विधानाने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली होती. या प्रकणात खुल्या चौकशीसाठीच्या फाइलवर तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी सही केली होती असं वक्तव्य अजित पवार यांनी जाहीर सभेत केले. तसेच आर. आर. पाटील यांनी केसाने माझा गळा कापण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अजित पवारांनी केला. या प्रकरणावरुन आर आर पाटील यांच्या कुटुंबासह शरद पवार गटाने अजित पवारांवर जोरदार टीका केली होती.

आता या प्रकरणात सुप्रिया सुळेंनी केलेल्या टीकेला अजित पवार यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

अजित पवार यांनी तासगावच्या कवठे महांकाळ येथे संजयकाका पाटील यांच्या प्रचारसभेत बोलताना माजी गृहमंत्री आर आर पाटील यांच्याबाबत भाष्य केलं होतं. माझ्यावर ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप झाल्यानंतर आर आर पाटील यांनी खुली चौकशी करण्याच्या फाईलवर स्वाक्षरी केली होती, असा दावा अजित पवार यांनी केला.

त्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी आर आर पाटील यांच्या कुटुंबियांची माफी मागितली होती. मी आर आर पाटील यांच्या कुटुंबाशी चर्चा



केली मी त्यांना सॉरीही म्हटलं. कारण मला खूप दुःख झालं. आर आर पाटील यांचं निधन ९ वर्षांपूर्वी झालं आहे. आज त्यांची आई, त्यांची पत्नी, मुलं हयात आहेत.

त्यांना या आरोपांमुळे काय वाटलं असेल? हे वाटूनच मी त्यांना सॉरी म्हटलं, असं सुप्रिया सुळेंनी एका मुलाखतीमध्ये सांगितले.

अजित पवार यांना आर आर पाटील यांच्याबाबत केलेल्या वक्तव्याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी सुप्रिया सुळेंच्या माफीबद्दल बोलताना ही सगळी नौटंकी असल्याचे अजित पवार यांनी म्हटलं. यावरु, अरे बापरे बापरे...फारच माफी मागावी लागली...ही तर सगळी नौटंकी आहे. कशाला याला काही महत्त्व देता, असं अजित पवार म्हणाले.

**काय म्हणाले होते अजित पवार?**

२०१४ साली देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मला बोलावून घेतले आणि आर. आर. पाटील यांनी स्वाक्षरी केलेली फाईल दाखवली. एसीबीमार्फत माझी खुली चौकशी करण्याचे आदेश आर. आर. पाटील यांनी दिले होते. मला ही गोष्ट कळल्यानंतर दुःख वाटले. आर. आर. पाटील यांनी माझा केसाने गळा कापल्याची भावना निर्माण झाली, असं अजित पवार यांनी म्हटलं.

## संपादकीय

# राजकारणी बेभान!

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसा प्रचाराला वेग येत आहे. विविध पक्षांच्या देशपातळीवरच्या नेत्यांपासून गावपातळीपर्यंतच्या अनेक नेत्यांनी ठिकठिकाणच्या सभांमधून प्रचाराला सुरुवात केली आहे; मात्र प्रचाराच्या नावाखाली पक्षाच्या नेत्यांकडून आणि उमेदवारांकडून वैयक्तिक पातळीवर जाऊन प्रतिस्पर्धी उमेदवाराची निंदानालस्ती, चारित्र्यहनन करणे सुरू आहे. प्रचारादरम्यान आपल्याकडून होणाऱ्या असंस्कृत, असभ्य आणि विखारी भाषेचा समाजमनावर काय परिणाम होईल याचेही साधे भानही काही नेत्यांना राहिलेले नाही. नेतेमंडळींच्या बेताल वक्तव्याने प्रचाराची इतकी खालची पातळी गाठली आहे की, जनतेला या सगळ्याचा किळस येऊ लागला आहे. निवडणुकीचा प्रचार हा आपण आणि आपल्या पक्षाने आतापर्यंत काय कामगिरी केली, पक्षाचे धोरण काय असेल आणि भविष्यात कोणती कामगिरी करणार, याचा तपशील मतदारांसमोर मांडण्यासाठी केला जात असतो. मतदारांचीही हीच अपेक्षा असते. आपण ज्या मतदाराला मत द्यायचे आहे त्याची दूरदृष्टी काय आहे, आपल्या जबाबदारीचे त्याला आणि त्याच्या पक्षाला कितपत भान आहे आणि त्याचा वकुब काय आहे, हे जाणून घेण्यातच जनतेला रस असायला हवा. पण आता आपण उमेदवार म्हणून किती पात्र आहोत अथवा आपला पक्ष कसा योग्य आहे हे पटवून देण्याऐवजी प्रतिपक्ष आणि त्यांचा प्रतिस्पर्धी उमेदवार कसा नालायक आहे, यावर टीकाटिप्पणी करणे हाच प्रचार समजला जात आहे. बरे हे करताना किती खालची गाठायची याची दररोज निचतम पातळी गाठण्याचे रेकॉर्ड करण्याचा विडाच जणू काही राजकारण्यांनी उचलला आहे हे सध्याच्या प्रचारसभा पाहताना प्रकर्षाने जाणवत आहे. कोण महिलांच्या चारित्र्यावर हल्ले करत आहे, तर कोण शारीरिक व्यंग अथवा आजाराची खिल्ली उडवण्याचा निर्लज्जपणा दाखवत आहे. या सगळ्यात विषण्ण करणारी बाब महणजे, त्यावेळी उपस्थित असलेले कार्यकर्ते त्याला खदखदून हसत दाद देताना दिसत आहेत. कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र माझा, असेच या लोकांना विचारण्याइतका जनतेच्या अंगाचा तीळपापड होत आहे. महायुतीतील घटक पक्षाचे एक नेते सदाभाऊ खोत यांनी नुकतीच राज्यातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर एकेरी भाषेत जी अश्लाघ्य टीका केली त्यामुळे राज्यातील जनता व्यथित झाली आहे. आता त्यांनी दिलगिरी व्यक्त केली असली, तरी त्यामुळे अनेकांच्या मनाला झालेल्या वेदना कमी होतील का? काहीही करून निवडणूक जिंकण्याच्या भरात नेतेमंडळींना आपण आधी माणूस आहोत याचा विसर पडत आहे, हे अतिशय धक्कादायक आहे. या सगळ्यातून सत्तेवर जाण्याचा त्यांचा हव्यास किती पराकोटीचा आहे हेच दिसून येत आहे. सदाभाऊ खोत यांचे हे पहिलेच वादग्रस्त विधान नाही. आता कुठल्या पक्षाने आपली पातळी सोडली नाही असे दिसत नाही. निवडणुकीच्या प्रचारानिमित्त सुरू झालेल्या राजकीय चिखलफेकीत सर्वच राजकीय पक्षांचे नेते सहभागी झाले आहेत आणि कोणताही विधिनिषेध न बाळगता एकमेकांवर यथेच्छ चिखलफेक करत आहे. कोण कुणाला कुत्रा महणत आहे, तर दुसरा डुक्कर अशी संभावना करत त्याची परतफेड करत आहे. गल्लीत होणारी पोराटोरांच्या भांडणाची पातळी तरी यापेक्षा बरी महणण्याची वेळ या वाचाळवीरांनी जनतेवर आणली आहे. या सगळ्यात सुसंस्कृत आणि पुरोगामी म्हणून ओळखल्या महाराष्ट्राचे देशात हसू होत आहे, याचेही भान या नेत्यांना राहिलेले नाही. किंबहुना महाराष्ट्र आता पूर्वीसारखे सुसंस्कृत राहिलेले नाही, असाच संदेश पसरवण्याचे काम सुरू आहे की काय, असा प्रश्न पडतो. सदाभाऊ खोत यांनी आपल्या वक्तव्याने महायुतीलाच अडचणीत आणल्याने वरिष्ठ नेतेही अस्वस्थ झाले आहेत. पूर्वी धरणातील पाण्याबद्दल बोलताना जीभ घसरलेल्या अजित पवार यांच्यावर आता 'बेताल वक्तव्ये करून नवीन प्रश्न निर्माण करू नका, राज्य अशी वक्तव्य सहन करत नाही' असे सांगण्याची पाळी आली आहे. सतेज पाटील यांनीही नुकत्याच केलेल्या आक्षेपार्ह विधानांमुळेही गदारोळ झाला. त्या आधी संगमनेर येथे भाजप नेते वसंतराव देशमुख यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्येबद्दल संतापजनक उद्गार काढल्याने वादळ उठले होते. पराभव दिसू लागला की, भल्याभल्यांचा स्वतःवरचा ताबा सुटतो. त्यांना येणाऱ्या नैराश्यातून ते वाट्टेल ते बरळू लागतात. त्यांचे ताळतंत्र सुटते. जनतेला हे सारे पुरते ठाऊक आहे. त्यामुळे टाळ्या मिळवणारी वक्तव्ये करून आपल्या मतांमध्ये भर पडेल या भ्रमात नेत्यांनी राहण्याची गरज नाही आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अशा वाक्यांवर टाळ्या वाजवण्यापेक्षा या बेभान नेत्यांना त्यांची जागा दाखवून देण्याचे कर्तव्य मतदानाच्या दिवशी मतदारांना पार पाडावे लागेल.

# विधानसभा निवडणुकीत मतदान टक्केवारी वाढण्यासाठी व्यापक जनजागृती करा-विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांचे आवाहन

नाशिक -विधानसभा निवडणुकीत नाशिक विभागातील पाचही जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी आणि त्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिल्या.

स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून पाचही जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या मतदार जनजागृती संदर्भातील उपक्रमांचा आढावा विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतला. त्यावेळी ते बोलत होते. पाचही जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त, स्विपचे नोडल अधिकारी आदींची यावेळी उपस्थिती होती. तसेच विभागीय आयुक्तालय येथे उपायुक्त सुभाष बोरकर, तहसीलदार पल्लवी जगताप, नगरपालिका प्रशासन शाखेचे उपायुक्त श्रीनिवास कुन्हे उपस्थित होते.

डॉ. गेडाम म्हणाले की, विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होत आहे. अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचून त्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रवृत्त करणे, त्यासाठी मतदार जागृतीच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविणे गरजेचे आहे. पाचही जिल्ह्यात स्विपच्या माध्यमातून स्वीपच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातही मतदार जनजागृती मोठ्या प्रमाणात होणे आवश्यक आहे,

असे सांगून डॉ. गेडाम म्हणाले की, मागील निवडणुकीपेक्षा यावर्षीच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी मोठ्या प्रमाणात वाढावी यासाठी विविध यंत्रणांनी समन्वयाने आणि व्यापक प्रयत्न करणे गरजेचे आहे. सध्या सोशल मीडियाचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो आहे. त्यामुळे



या घटकाचा उपयोग मतदार जनजागृती साठी करण्यात यावा. सोशल मीडियावर सक्रिय आणि लोकप्रिय असणाऱ्या घटकांची यासाठी मदत मतदार जनजागृती करण्यात येत आहे. प्रत्येक जिल्ह्यातील मतदार जनजागृती साठी राबविण्यात येणाऱ्या संकल्पना इतर जिल्ह्यातही राबविण्यात याव्यात, अशी सूचना त्यांनी केली.

घेण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले. स्वीपच्या माध्यमातून होणारे विविध उपक्रम सर्व घटकापर्यंत पोहोचावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची सूचनाही त्यांनी केली. विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होणार आहे. प्रत्येक पात्र मतदारांनी त्यांचा मतदानाचा हक्क जरूर बजावावा, असे आवाहनही डॉ. गेडाम यांनी केले.

यावेळी पाचही जिल्ह्यातील विविध विधानसभा मतदारसंघात स्वीपच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. गृहभेट, आशा कार्यकर्ती, अंगणवाडी ताई, महिला बचत गट आदीच्या माध्यमातून विभागात मतदार जनजागृती करण्यात येत आहे. याशिवाय, सोशल मीडिया, एफ एम रेडिओ, बस स्थानके याठिकाणीही जिंगल्स द्वारे मतदारांना मतदानाचा हक्क बजावण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

## घरगुती वीज जोडणी देण्यासाठी २० हजारांची लाच घेताना रंगेहाथ अटक

जळगाव -घराचे बांधकाम पूर्ण झाल्यावर नवीन वीज कनेक्शन सुरु करण्यासाठी सुरुवातीला १० हजार रुपये देऊनही पुन्हा २० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या वरिष्ठ तंत्रज्ञाला जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना अटक केली आहे. त्याच्यावर एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

जळगाव शहरात राहणाऱ्या ४८ वर्षीय तक्रारदार यांचे घराचे बांधकाम साईटचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर ठिकाणी नवीन पोल टाकण्यात आले होते. सदर पोल वरून विज कनेक्शन सुरु करण्यासाठी तक्रारदार हे महावितरण कार्यालय शिरसोली, जळगाव येथे वेळोवेळी गेले होते. वरिष्ठ तंत्रज्ञ विक्रांत अनिल पाटील देसले (वय ३८ वर्षे, शिरसोली युनिट रा. माऊली नगर, जळगाव) यांनी सदरचे काम करून देण्याचे मोबदल्यात ३० हजार रुपयेची लाचेची मागणी केली होती. पैकी १० हजार रुपये या अगोदर घेतले होते. तरीपण विज कनेक्शन चालु करून देत नव्हते. ते विज कनेक्शन चालू करून देण्यासाठी उर्वरीत ठरलेले २० हजार रुपयांची लाचेची मागणी करीत होते. त्याबाबत तक्रारदार यांनी जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे दि. १८ रोजी तक्रार दिली होती. सदर तक्रारीप्रमाणे पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात आली. त्यानुसार शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर रोजी वरिष्ठ तंत्रज्ञ अनिल देसले पाटील यांना उर्वरित २० हजार रुपये लाच रककम घेताना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यांच्या विरुद्ध एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धुळे शहरात आज होणार मतदान

## २६८ वृध्द, दिव्यांग मतदार बजावणार मतदानाचा हक्क

धुळे -विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान व्हावे, यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय यंत्रणेने नियोजन केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपुढील व दिव्यांग मतदार जे मतदान केंद्रापर्यंत जाऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार ०६-धुळे शहर विधानसभा मतदार संघात २६८ मतदारांनी निवडणूक यंत्रणेकडे अर्ज भरून दिले आहे. या मतदारांसाठी १० नोव्हेंबरला संबंधितांच्या घरी जावून मतदान घेण्यात येणार आहे. अशी माहिती धुळे शहर विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार यांनी दिली आहे.



केंद्रात जावून मतदान करणे शक्य नसलेल्या मतदारांची संख्या २६८ एवढी आहे. या सर्व वृद्ध मतदारांच्या घरी जावून मतदान घेतले जाणार आहे. यासाठी धुळे शहर विधानसभा मतदार संघात १० नोव्हेंबरला सकाळी ८.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ही प्रक्रिया राबवण्यात येईल. तर या तारखेस अनुपस्थित असलेल्या मतदारांसाठी १२ नोव्हेंबर रोजी मतदान घेतले जाणार आहेत. त्यासाठी १४ पथके तयार करण्यात आली आहे.

या प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक पोलीस कर्मचारी, एक स्थूम निरिक्षक तर एक व्हीडीओग्राफर अशी ५ कर्मचाऱ्यांची टीम असणार आहे. तरी धुळे शहर विधानसभा मतदार संघातील ज्या ८५ वर्षावरील व दिव्यांग मतदारांनी गृह मतदानासाठी नोंद केली आहे त्यांनी याची नोंद घेऊन आपला मतदानाचा हक्क बजवावा. तसेच या दोन्ही दिवशी मतदार अनुपस्थित असल्यास त्यांना मतदानाची संधी नसेल. असेही निवडणूक याकरीता धुळे शहर विधानसभा मतदार संघातील ८५ वर्षांपेक्षा जास्त वयाचे, दिव्यांग मतदारांची आपआपल्या कार्यक्षेत्रातील बीएलओंनी निर्णय अधिकारी श्री. शेलार यांनी कळविले नोंद करून अर्ज भरून घेतले आहेत. यापैकी मतदान आहे.

# केंद्रीय निवडणूक निरीक्षक रणजीत कुमार यांची आंतरराज्य सीमा तपासणी नाका हाडाखेड येथे भेट

धुळे -विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने शिरपूर तालुक्यातील विधानसभा मतदारसंघाच्या आंतरराज्य एकत्रित सीमा तपासणी नाका येथील स्थिर सर्वेक्षण पथक कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. याठिकाणी निवडणूक निरीक्षक रणजीत कुमार यांनी अचानक भेट दिली. त्यांच्या सोबत कार्यकारी अभियंता पडांगळे, गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, मंडळ अधिकारी प्रशांत ढोले होते. निवडणूक निरीक्षक रणजीत कुमार यांनी तेथील कामकाजाची पाहणी केली. स्थिर सर्वेक्षण पथकास आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना दिल्यात. त्याचबरोबर या मार्गावरून येजा करणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून तपासणी करण्याची निर्देश दिले. यावेळी स्थिर सर्वेक्षण पथक प्रमुख तुषार बैसाणे,



वाहन निरीक्षक मंगेश वाघ व सचिन सानप, पोलीस हवालदार सुनील साळुंखे, निलेश राऊत, वन विभागाच्या श्रीमती विजया वळवी, दिनेश पावरा आदि उपस्थित होते.

दहिवद येथील मतदान केंद्रास भेट

त्यानंतर निवडणूक निरिक्षक श्री. रणजित कुमार यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दहिवद येथील मतदान केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी या मतदान केंद्रांवरील ज्येष्ठ मतदार नारायण ओंकार पाटील यांच्यासोबत चर्चा केली तसेच या मतदान केंद्रांवर यापूर्वी मतदान करताना काही अडचण येतात काय याबाबत विचारणा केली व या मतदान केंद्रावरील सोयीसुविधांची पाहणी केली.

यावेळी मंडळ अधिकारी श्रीमती शितल गिरासे, मुख्याध्यापक हिलाल छबु पाटील, बीएलओ आर. वाय. रणदिवे, कांतीलाल रोहिदास पाटील, नरेंद्र रमेश पवार, यश चंद्रकांत पाटील आदि उपस्थित होते.

## नवडणे शिवारात ६७ लाखांचा दारुसाठा जप्त स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई

धुळे : साक्री तालुक्यातील नवडणे शिवारातील एका शेतात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने गुप्त माहितीवरुन केलेल्या कारवाईत ६७ लाख २०० रुपये किमतीचे विदेशी दारुचे ७०० खोके जप्त केले आहेत. जप्त केलेला दारुसाठा हा गोवा राज्यात निर्मित आहे. याप्रकरणी तिघांविरुध्द साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवडणे गावाच्या शिवारात संदीप उर्फ मुन्ना शरद ठाकरे याचे शेत आहे. या शेतातील पत्रटी शेड असलेल्या गोदामात गोवा राज्यात निर्मित केलेला दारुसाठा मोठ्या प्रमाणात साठवणूक करुन ठेवला असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना मिळाली. त्यानुसार, निरीक्षक श्री. पवार यांने अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार करुन पथकाला कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. पथकाने दि.७ रोजी सायंकाळी या गोदामावर छापा टाकला. या ठिकाणी ६७ लाख २०० रुपये किमतीची गोवा राज्यात निर्मित केलेली विदेशी दारुचे ७०० खोके आढळून आले. पथकाने सर्व मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी हवालदार योगेश चव्हाण यांनी साक्री पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन शेत मालक संदीप उर्फ मुन्ना ठाकरे यांच्यासह हरेकृष्णा मोतीराय (३५) रा. नागाटोला, गौरेया मनेर, पटणा, शादीकपूर बिहार, भूषण ठाकरे या तिघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेत मालक संदीप ठाकरे हा पसार झाला असून पथकाने दोघांना ताब्यात घेतले आहे.

# आज भौतिक सुविधा आहेत परंतु शिक्षणाचा पाया कच्चा आहे-जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे

धुळे- जीवनात शालेय शिक्षणच महत्त्वाचे आहे. वीस वर्षांपूर्वी शिक्षणात भौतिक सुविधा नव्हत्ला. परंतु शैक्षणिक गुणवत्ता होती. आज भौतिक सुविधा आहेत परंतु शिक्षणाचा पाया कच्चा आहे, अशी खंत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी व्यक्त केली. तसेच मोबाईल विरहित बालसंगोपन व्हावे, मोबाईल हा सायलेंट किलर आहे. मोबाईलचा सकारात्मक विचार केला पाहिजे.

शहरातील अग्रसेन लॉन्समध्ये महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या धुळे केंद्रातर्फे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सिईओ नरवडे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र बाल शिक्षण परिषदेचे राज्य अध्यक्ष डी. एम. कस्तुरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. किरण ) कुवर उपस्थित होत्या, कार्यक्रमात बालशिक्षणातील नवी दिशा आणि त्यातील सामाजिक आर्थिक जाणीवा या विषयावर डॉ. मंजिरी निंबकर यांचे बीज भाषण झाले, परिषदेच्या धुळे शाखेच्या अध्यक्षा मनिषा ठाकरे यांनी मान्यवरांचे स्वागत करून बालशिक्षणाची भूमिका स्पष्ट केली. गिजुभाई बधेका, ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. कृत्रिम चुद्धिमत्ता आणि तिना बालशिक्षणातील जोशी वापर या विषयावर एम. के. सी. एल. चे सल्लागार विवेक सावंत यांचे व्याख्यान झाले. मान्यवरांचा परिचय अनुक्रमे मेधा कुलकर्णी, संगीता पाटील, अरुंधती ब्रम्हे, सुवर्णा नेरकर यांनी करून दिला. कार्यक्रमास बालशिक्षण परिषदेच्या राज्य कार्यकारिणी



सदस्या अलका बियाणी, शिल्पा म्हस्कर, सचिव अरुणा पानपाटील, सुषमा पाध्ये, डॉ. दिनेश नेहते, नंदलाल रुणवाल, के.यु. नाबरिया, अरुणा नाईक, साधना मानेकर, मुख्याध्यापिका मनीषा जोशी गांच्यासह साहित्य व शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन केदार नाईक यांनी केले. यावेळी वर्षा लिखित संगीतानुभव या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांनी केले. अधिवेशनासाठी राज्यभरातून ५५० पेक्षा अधिक शिक्षकांनी नोंदणी केली आहे.

नव्या पिढीवर संस्कार गरजेचे बालकांशी संवाद साधताना औपचारिक व अनौपचारिक कसे असावे याविषयी डी. एम. कस्तुरे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. किरण कुवर म्हणाले, लहान मुलांना शिकविण्याची खरी जबाबदारी आईची आहे. मुलांचे रडणे थांचविण्यासाठी मोबाईल देणे चुकीचे असून जुन्या पिढीने नव्या पिढीवर संस्कार करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

डॉ. मंजिरी निबकर म्हणाल्या, मुलांच्या प्रत्येक कृतोला प्रोत्साहन दिले पाहिजे, त्यांच्या गोष्टींचा आदर करावा, त्यांना सकारात्मक अनुभव द्यावे. त्यामुळे त्यांच्या मेंदूची जडणघडण चांगली होते. मुलांवर लैंगिक अत्याचार ही जुनी गोष्ट आहे, परंतू आजच्या काळात त्याला वाचा फुटते. मुलांना शिकण्याची जबाबदारी कळू द्यावी, असे त्यांनी सांगितले. मुलांना यंत्रवत घडवू नका! कृत्रिम बुद्धिमत्ता ही तात्विक गोष्ट आहे.

मानव हा परिपूर्ण असून मानवी बुद्धिमत्ता अलौकिक आहे, तर कृत्रिम बुद्धिमत्तेला अनेक मर्यादा आहेत. मानवी बुद्धिमत्ता व कृत्रिम बुद्धिमत्ता यात साम्य नाही. मुलांना यंत्रवत घडवू नका, त्यांना स्वतंत्र विचार व स्वतंत्र अनुभव द्यायला हवे. मुलांना भावना हावभाव असतात, रोबोटला नव्हे. अशा शब्दात विवेक सावंत यांनी मनोगत व्यक्त केले. दुपार सत्रात कमलाबाई शंकरलाल कन्या शाळेत वेगवेगळ्या विषयांवर कार्यशाळा झाली. त्यात संशोधक व प्रशिक्षण माध्यमातून गटागटांनी मार्गदर्शन करण्यात आले. सार्यकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात खान्देशी बाणा या विषयावर सुजय भालेराव व सहकारी यांनी खान्देश संस्कृतीचे दर्शन घडविले, अशी माहिती प्रसिद्धीप्रमुख रवींद्र टाकणे यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी-३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगांव-४२५००१ येथे शॉप नं.ई/१२ चौथा मजला गोलाणी मार्केट, ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. ◆ **मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी** ✱ **संपादक: नंदलाल मराठे** (९१७५९९६२३२) (✱ पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख या मधून झालेल्या मतांशी संपादक / सहमत असतीलच असे नाही. **Email- dainikshauryamarathi@gmail.com** (RNI-MAHMAR/2023/89125)







## टीईटी परीक्षा : दीड तास आधीच परीक्षा केंद्रांवर पोहचा !
## शहरातील १३ केंद्रांवर ११०५३ परीक्षार्थी होणार आज प्रवीष्ठ

धुळे : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२४ (महाटीईटी) उद्या (दि.१०) शहरातील १३ केंद्रांवर घेतली जाणार असून, या परीक्षेत ११०५३ परीक्षार्थी प्रवीष्ठ होणार आहेत. गैरसोय टाळण्यासाठी परीक्षा सुरू होण्याच्या दीड तास आधीच म्हणजे पेपर १ साठी सकाळी ९ वाजता आणि पेपर दोनसाठी दुपारी १ वाजता परीक्षार्थींनी परीक्षा केंद्रांवर पोहचण्याचे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांनी केले आहे.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा परीक्षा १० नोव्हेंबर घेण्यात येणार आहे. ही परीक्षा सकाळ व दुपार अशा दोन सत्रात घेण्यात येणार आहे. परीक्षेचा पेपर क्रमांक १ सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत घेण्यात येईल. परीक्षेचा दुसरा पेपर दुपारी २.३० ते ४ या वेळेत घेण्यात येईल. या परीक्षेला प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावरून परीक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. प्रवेशपत्राशिवाय उमेदवारांना परीक्षागृहात प्रवेश दिला जाणार नाही. तसेच सोबत ओळखपत्र आवश्यक आहे. या परीक्षेस ११०५३ विद्यार्थी प्रविष्ठ होणार आहेत. त्यांची बैठक व्यवस्था धुळे शहरातील १३ परीक्षा केंद्रांवर करण्यात आली आहे. तसेच पेपर-१ व पेपर-२ सुरु होण्यापूर्वी परीक्षा केंद्रात ९० मिनिटेआधी म्हणजेच दीड तास अगोदर परीक्षार्थींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

उशीरा येणाऱ्या परीक्षार्थींना परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात येणार नाही. तसेच उशीरा आल्यानंतर परीक्षार्थींनी गदारोळ करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांचे विरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी दिलेल्या आहेत, अशी माहिती शिक्षणाधिकारी कुंवर यांनी दिली. परीक्षेचे संपूर्ण कामकाजाचे व्हीडीओ चित्रिकरण होणार असून परीक्षार्थींनी त्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रावरील सूचनांचे वाचन करून त्यांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

प्रवेश पत्रावर दिलेल्या सुचनांनुसार परीक्षार्थींनी परीक्षागृहात मोबाईल फोन, इतर इलेक्ट्रॉनीक वस्तू, नोटस, पुस्तके, वाचन साहित्य या प्रकारचे कोणतेही साहित्य आणू नये. असे साहित्य आणल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवारांने गैरमार्गाचा अवलंब करण्यासाठी आणले असे समजून त्यांच्या विरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षेसाठी चार भरारी पथके नियुक्त केलेले असून प्रत्येक केंद्रांवर शिक्षण विभागाचा अधिकारी सहा. परिरक्षक म्हणून पूर्णवेळ निरीक्षण करणार आहे. तसेच जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक हे परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्रांना भेटी देणार आहेत. त्यावेळी कोणताही उमेदवार गैरमार्गाचा अवलंब परीक्षार्थींचे बायोमॅट्रीक स्कॅन होणार टीईटी परीक्षेत प्रवीष्ठ होणाऱ्या प्रत्येक परीक्षार्थींचे बायोमॅट्रीक स्कॅन परीक्षा केंद्रावर होणार आहे. तसेच परीक्षार्थींचा चेहरा स्कॅन केला जाणार आहे. यामुळे परीक्षार्थींनी पेपर १ आणि पेपर २ सुरू होण्यापूर्वी दीडतास अगोदार परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. कारण बायोमॅट्रीक स्कॅनसाठी परीक्षार्थींना तेवढा वेळ देणे गरजेचे आहे, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

करीत असल्याचे आढळून आल्यास त्यांचे विरुध्द फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल केले जावून त्यास ब्लॅकलिस्ट करण्यात येईल. तसेच परीक्षेपासून कायमस्वरुपी अपात्र करण्याची कारवाई करण्यात येणार आहे, असे आवाहन परीक्षा नियंत्रक तथा शिक्षणाधिकारी किरण कुंवर यांनी केले आहे.

## गांजा बाळगणाऱ्या सारबेटच्याच्या दोघांना हेडावे गावाजवळ अटक

अमळनेर शहरात गांजा विक्रीसाठी आणणाऱ्या सारबेटे येथील दोघांना पोलिसांनी हेडावे येथे सापळा रचून पकडले आहे. या संशयित आरोपींकडून सुमारे साडेतीन किलो गांजा जप्त करण्यात आला असून या दोघांना अटक करण्यात आली आहे.



पोलीस निरीक्षक विकास देवरे यांना गोपनीय माहिती मिळाली की, तालुक्यातील सारबेटे येथून दुचाकी (एमएच० १९, डीयू ९५४३) ने दोन जण अमळनेर शहरात गांजा विकण्यासाठी आणत आहेत. त्यानंतर देवरे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पिंगळे, हेडकॉन्स्टेबल सुनील महाजन, हेडकॉन्स्टेबल मिलिंद सोनार, जितेंद्र निकुंभे, अमोल पाटील, विनोद संदानशिव, संतोष नागरे, सागर साळुंखे यांना घेऊन हेडावे गावाजवळ सापळा रचला. सायंकाळी पावणे सहा वाजेच्या सुमारास दोन जण दुचाकी एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल (एमएच १९, डीयू ९५४३) वर येताना दिसले. पोलिसांनी त्यांना अडवले असता त्या दोघांच्यामध्ये पांढऱ्या रंगाची प्लास्टिकची गोणी आढळून आली. त्यात गोणीत गांजा सापडला.

पोलिसांना चौकशीत त्यांनी ते सारबेटे येथील अकील इब्राहिम मेवाती (वय ३७) व मोहसीनखान शरीफखान मेवाती (वय ३२) असे नाव असल्याचे सांगितले. पोलिसांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या समक्ष गांजाचे

मोजमाप केले असता ६८ हजार रुपयांचा ३ किलो ४३२ ग्रॅम गांजा, तसेच ६० हजारांची दुचाकी व १० हजारांचा मोबाईल असा एकूण १ लाख ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मिलिंद सोनार यांच्या फिर्यादीवरून या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र पिंगळे करत आहेत.

## पाळधी रेल्वे स्थानकावरील आरक्षण खिडकीवर दलालांचा ताबा

जळगाव- पाळधी, ता. धरणगाव येथील रेल्वे स्थानकावर आरक्षण खिडकी असून त्यात तत्काळ तिकीट सुविधा उपलब्ध आहे. मात्र, या तत्काळ तिकीट खिडकीवर दलालांनी ताबा घेतला असून सर्व सामान्य नागरिकांना त्याचा फायदा होत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

पश्चिम रेल्वेचे जळगावहून पाळधी हे पहिले तर सुरतहून शेवटचे रेल्वे स्थानक आहे. आता पाळधीचे रेल्वे स्थानक अद्ययावत झाले आहे. तर येथे बहुतेक सर्व सुविधा उपलब्ध आहेत. येथे गाड्यांचा थांबा मर्यादित असूनही प्रवाशी संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या स्थानकाला लागूनच जवळपास २५ ते ३० खेडी आहेत. या कारणाने या स्थानकावर प्रवाशींची बरीच वर्दळ असते. दरम्यान, येथील नागरिकांना आरक्षणासाठी जळगाव अथवा धरणगाव येथे जावे लागत होते. या संदर्भात प्रवाशांनी केलेल्या मागणीची दखल घेऊन येथे आरक्षण खिडकी सुरू करण्यात आली आहे. सुरुवातीला ही सुविधा असल्याचे कुणालाही माहित नसल्याने येथील आरक्षण खिडकीवर गर्दी कमी होत असे. मात्र, आता येथे गर्दी वाढू लागली आहे. याचाच फायदा दलालांनी घेत या खिडकीवर ताबा मिळवला आहे. त्यांनाच आरक्षण मिळत असल्याने सर्व सामान्य नागरिकांना खाली हात परतावे लागत आहे. त्यामुळे

पाळधीसह परिसरातील नागरिकांसाठी सुरू केलेल्या सुविधेवर दलालांनी ताबा मिळवला आहे. तर रेल्वे प्रशासन म्हणते आरक्षण फुल्ल तर दलाल म्हणतात आरक्षण उपलब्ध, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या दिवाळीचा सुट्टया आहेत. त्या आता लवकरच संपत असल्याने नागरिक तत्काळ आरक्षण काढत आहेत. मात्र, त्या आधीच दलालांची माणसे तेथे येत असून नागरिकांकडून अवाच्या सव्वा दर आकारून ते लुटत आहेत. या गंभीर प्रश्नाकडे रेल्वे प्रशासनाने लक्ष घालून दलाल मुक्त खिडकी करावी, अशी मागणी प्रवाशी वर्गातून होत आहे.

## वहन उत्सवात वासुदेव जोशी समाजाचे एकतेचे दर्शन

जळगाव : दिवाळी संपल्यानंतर जळगावकरांना रथोत्सव व वहनोत्सवाचे वेध लागले असून वासुदेव जोशी कॉलनीत ऐरावत वहनाचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. सर्वांनी अंगणात रांगोळ्या काढून पुष्पवृष्टीकरत वहनाचे स्वागत केले. यावेळी सर्व समाज बांधव व तरुण मित्र मंडळ वर्ग, समाज बांधव ज्यात सर्व समाज बांधव महिला पुरुष, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले सर्व एकत्र येऊन एकतेचे दर्शन घडवले.





जोशी समाजाचे जेष्ठ आनंदा जोशी, सेवानिवृत्त मंडळ अधिकारी सदाशिव जोशी यांच्या नेतृत्वाखाली अनेक चांगल्या चळवळी उभ्या केल्या जात आहेत. त्याच प्रमाणे वहन उत्सवासाठी देखील जोशी समाजाने पुढाकार घेतला असून वहनाला तेल पाणी व रंगरंगोटी करण्यासाठी सल्लागार पांडुरंग शिंदे किरण जोशी, प्रमोद जोशी, अनिल पवार, रविंद्र रणदिवे, किशोर विधाते, सुनील कानडे, रवींद्र दोरकर, ललित अहिरराव, राहुल दोरकर, अनिल जाधव, अनिल दोरकर, अनिल लागवणकर, वहनावर जोशी कॉलनीत फुलांचा वर्षाव ॐ श्री गुरु गोरक्षनाथ मंदिर पाटील प्रभाकर पाटील व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

विजय विधाते, निलेश गोंधळी, संतोष मोरकर, प्रवीण चितार, विशाल जोशी, विनोद बारेस, राकेश भोजने, अरुण झोटिंगे, राजेश जोशी, जागेश्वर जोशी, सुहास जोशी, रितेश जोशी, कमलेश देवरे, विवेक शिंदे, विवेक गोंधळी, चेतन गोंधळी, मंदिराचे पुजारी भास्कर पोळ, सेवक दिलीप श्रीखंडे, अनुप गोंडे, जगदीश झोटिंग, पवन जोशी, गोविंदा झोटिंगे, स्वप्नील पांचाल, स्वप्निल जोशी, गोविंदा भोजने, निलेश विधाते, प्रदीप जोशी, वासुदेव जोशी व तरुण मित्र मंडळ तसेच तांडव ग्रुप यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी राम मंदिराचे ट्रस्टी व पूज्य मंगेश महाराज, पोलीस दरम्यान भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ललित अहिरराव व त्यांच्या सर्व भजनी मंडळांनी छान भजनात रंगत आणली. यात विशेषतः निलेश गोंधळी, प्रमोद जोशी, किशोर महाराज विधाते, बाळू जोशी, कंखरे बंधू, राम-शाम बंधू, निलेश विधाते, राहुल विधाते यांनी या कार्यक्रमात भजने गाऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. यावेळी प्रकाश शेठ बालानी, हभप सुखदेव महाराज, राहुल दोरकर यांची उपस्थिती होती.

## भुसावळ तालुक्यातील सरकारी शाळांमध्ये सीसीटीव्हीचा प्रश्न गंभीर
### आचारसहिंतेचा अडसर; जिल्हा नियोजन समितीकडून होणार निधी मंजूर; वरिष्ठांचे सुतोवाच

भुसावळ : मागील काही महिन्यांत बदलापूरमधील विविध शाळांमध्ये दोन चिमुडयांवर अत्याचार झाल्याच्या घटना घडल्यानंतर राज्य शासनाने जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश काढले आहेत. मात्र, भुसावळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभाग गंभीर नसल्याचे दिसून येत आहे.



या उपक्रमासाठी जिल्हा नियोजन समितीकडून ५ टक्के निधीची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, सध्या निवडणुका सुरु असून त्याच्या आचारसंहितेचा अडसर येत आहे, असे शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी सांगत आहेत. त्यामुळे सरकारी शाळेतीलच विद्यार्थ्यांची सुरक्षा ऐरणीवर आली असून, एखादा अनुचित प्रकार घडल्यास जबाबदार कोण? असा प्रश्न आता पालक विचारत आहेत. दरम्यान, गेल्या काही महिन्यांमध्ये बदलापूर, पुणे, कोलकता या ठिकाणी महिलांवरील अत्याचाराच्या घटना घडल्याने महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होऊ लागला होता. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलत सर्वच सरकारी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय घेतला आहे. तो निर्णय शाळास्तरावर पोहोचवण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची असून याकडे शिक्षण विभागाचा कानाडोळा होत आहे. या विषयाबाबत अनेक पालकांनी नाराजी व्यक्त केली असून, शिक्षणाधिकारी यांनी ठोस पावले उचलण्याची मागणी ही पालकांनी केली आहे.

आदेशाप्रमाणे प्राथमिक शिक्षण विभागाने तत्काळ जिल्हा परिषद शाळांकडून प्रस्ताव मागवले आहेत. हे प्रस्ताव सादर होऊन बर्याच दिवसांचा कालावधी उलटला तरी अद्याप याबाबत कोणतीही हालचाल दिसत नसल्याने कॅमेरे कधी बसणार, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. आचारसंहिता असल्यामुळे हा निधी मंजूर होत नसल्याचे कारण समोर आले आहे.

जिल्हा नियोजन समितीने राखीव ५ टक्के निधीतून कॅमेरे बसवावेत, असे निर्देश दिलेले आहेत. मात्र, ५ टक्के राखीव निधीचे नियोजन यापूर्वीच झालेले आहे.

जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश आहेत. त्यानुसार भुसावळ तालुक्यात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाने भुसावळ तालुक्यातील सहा केंद्राअंतर्गत ६५ शाळांसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर केला आहे. मात्र, सध्या विधानसभेची

या निधीतून नवीन वर्गखोल्या बांधकाम, वर्गखोल्या दुरुस्तीच्या प्रस्तावांना जिल्हा नियोजनकडून मान्यता मिळालेली आहे. तर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याकरिता निधीची तरतूद कशी करणार, असा ही यक्षप्रश्न समोर आहे.

**शासन निवडणुका संपल्यानंतर बसतील कॅमेरे**

भुसावळ तालुक्यातील माध्यमिक आणि खासगी सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. मात्र, जिल्हा परिषदेच्या शाळा बाकी आहेत. विधानसभेच्या निवडणुका संपल्यानंतर निधी मंजूर होऊन कॅमेरे बसवले जाणार आहेत.

**– किशोर वायकोळे, गट शिक्षणाधिकारी, भुसावळ**

## दुचाकीस्वार चोरट्यांचा सुळसुळाट
### सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यांत वाढ आडगाव, भद्रकाली, अंबड पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल

नाशिक : शहरात चैनस्नॅचिंगच्या गुन्ह्यांत वाढ झाली असून, वेगवेगळ्याा भागातून रस्त्याने पायी जाणाऱ्या तीन महिलांच्या गळ्यातील अलंकारांवर दुचाकीस्वार भामट्यांनी डल्ला मारला. या घटनांमध्ये सुमारे दोन लाख रूपये किमतीचे दागिने भामट्यांनी हिसकावून नेले असून याप्रकरणी आडगाव भद्रकाली व अंबड पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अमृतधाम परिसरातील ज्योती श्रीकांत जोशी (रा. गंगोत्री विहार, अमृतधाम) या बुधवारी (दि. ६) सायंकाळच्या सुमारास बिडी कामगार चौकातून आपल्या घराकडे पायी जात असताना ही घटना घडली. शनी मंदिरासमोर दुचाकीवर आलेल्या भामट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे ४९ हजार रूपये किमतीचे मंगळसूत्र ओरबाडून नेले. याप्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात जबरीचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास जमादार बाळासाहेब जाधव करीत आहेत.

दुसरी चैनस्नॅचिंग टाकळी रोडवरील म्हाडा वसाहत भागात झाली.

सरला दीपक वाघले (रा. हरी सागर सोसा. मातोश्रीनगर) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. वाघले या शेजारी राहणारे संजय तुरेकर

यांच्या समवेत दुचाकीवर जिल्हा रूग्णालयात जात असताना ही घटना घडली. तुरेकर यांच्या ॲक्टीव्हा दुचाकीवरून त्या प्रवास करीत असताना ट्रिपलसिट मोटारसायकलस्वारांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे ६८ हजार रूपये किमतीचे मंगळसुत्र हिसकावून नेले. याबाबत भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून अधिक तपास उपनिरीक्षक तोंडे करीत आहेत.

तिसरी घटना सिडकोतील पवननगर भागात घडली. वर्षा प्रदिप शेलदार (रा. कामटवाडे, सिडको) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. शेलदार गुरूवारी (दि.७) सायंकाळी भाजीपाला खरेदी करण्यासाठी पवननगर येथे गेल्या होत्या. भाजीपाला खरेदी करून त्या आपल्या घराकडे पायी जात असताना ही घटना घडली. एस. बँकेसमोरील गुरूकृपा किराणा दुकानाजवळून त्या पायी जात असताना डबलसिट आलेल्या दुचाकीस्वारांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे ६५ हजार रूपये किमतीचे मंगळसूत्र ओरबाडून नेले. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक निरीक्षक किरण रौंदळे करीत आहेत.

## कॉलर आयडीच्या माहितीवर विश्वास ठेवू नका; फसवणूक होईल-सरकारी अधिकाऱ्यांना सायबर दिनशानिर्देश

**नवी दिल्ली: देशात गोपनीय वैयक्तिक माहिती मिळवण्याच्या उद्देशाने आणि अधिकृत प्रणालींमध्ये अवैधरीत्या प्रवेश मिळवण्याच्या उद्देशाने 'विशिंग' हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे फोन कॉल येताच कॉलर आयडीवरील माहितीवर विश्वास ठेवू नये. यामुळे तुमची फसवणूक होऊ शकते, असा मौलिक सल्ला सायबर सुरक्षा सल्लागाराने शासकीय अधिकाऱ्यांना दिला आहे.**

शासकीय अधिकाऱ्यांसाठी सायबर धोक्यांपासून सावध राहण्याचे दिशानिर्देश राष्ट्रीय माहिती केंद्राने (एनआयसी) जारी केले.

एनआयसीने विविध सरकारी विभाग व मंत्रालयांना पाठवलेल्या दिशानिर्देशांमध्ये म्हटले आहे की, हल्लेखोर वरिष्ठ सरकारी अधिकारी, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था किंवा तांत्रिक सहायक कर्मचाऱ्यांसारख्या विश्वसनीय संस्थांचे रूप धारण करू शकतात. आपण कॉल केलेला क्रमांक हा वैध सरकारी आहे, हे भासवण्यासाठी हल्लेखोर कॉलर आयडीच्या माहितीत हेराफेरी करतात. देशात गोपनीय माहिती मिळवणे व अधिकृत प्रणालींमध्ये अनधिकृतपणे पोहोचण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना निशाणा सरकारी अधिकाऱ्यांना सायबर दिशानिर्देश जारी बनवण्यासाठी 'विशिंग हल्ले' वाढले आहेत.



म्हणूनच आम्ही अधिकाऱ्यांना सावध करीत असल्याचे एनआयसीने स्पष्ट केले.

पीडितांना गोपनीय माहिती देण्याच्या उद्देशाने प्रलोभन दाखवण्यासाठी फसवणुकीचे कॉल किंवा व्हॉईस मेसेजचा अनधिकृत वापर करणे हे 'विशिंग सायबर' हल्ल्याचे एक रूप आहे. अत्यंत तातडीचा संदेश देणे, लक्षित व्यक्तीला माहिती देण्यासाठी बाध्य करणे, जर आमची माहिती स्वीकारली नाही तर गंभीर परिणाम भोगण्याची धमकी देणे किंवा भ्रमित किंवा भीती घालण्यासाठी गुंतागुंतीची भाषा वापरण्याच्या रणनीतीचा वापर हल्लेखोर करू शकतात. कॉलर आयडीवर दिसणाऱ्या माहितीवरून सहजपणे फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांनी यापासून सावध राहावे, असे आवाहन एनआयसीने केले. एखादा कॉल आल्यानंतर त्या क्रमांकावर पटकन विश्वास ठेवू नका.

अधिकृत रेकॉर्डसह संबंधित एजन्सीचे प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही कॉलरची पडताळणी करण्याचा सल्लासुद्धा एनआयसीने अधिकाऱ्यांना दिला आहे. अधिकाऱ्यांनी संवेदनशील माहिती देण्यापूर्वी शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून कॉल करणाऱ्याची ओळख पटवून घ्यावी. संशयित व्यक्तीद्वारे देण्यात आलेल्या माहितीची पुष्टी करण्यासाठी वेळ घ्यावा. कामाच्या वेळी किंवा इतर सुरक्षित सायबर संवादासाठी स्थापित मापदंडांचे पालन करण्याचा सल्ला एनआयसीने दिला.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी एकास १० वर्षे सक्तमजूरी; भुसावळ येथील न्यायालयाचा निर्णय

भुसावळ (प्रतिनिधी ):- शहरातील एका भागात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीला फुस लाऊन पळवून नेत वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी मुलीच्या आईने सन २०१५ मध्ये बाजारपेठ पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून न्यायालयाने चौकशी अंती आरोपीस दोषी धरून तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याप्रमाणे दिनांक ८ रोजी आरोपीस १० वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली.

भुसावळच्या एका भागातील अल्पवयीन तरूणीला दिनांक २८ मे २०१५ रोजी फुस लावून पळवून नेले होते. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने २९ मे २०१५ ला भुसावळ बाजारपेठ पोलीस ठाण्यात गौतम शिवचरण चौव्हाण याच्याविरूध्द तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने संशयित आरोपी गौतम विरूद्ध बाललैंगिक अत्याचार कायदा कलम (३ अ) व (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पीडित मुलगी ही आई, वडिलांना मिळाल्यानंतर आरोपीने दिलेल्या धमक्यामुळे सुरूवातीला तिने अत्याचाराच्या घटनेबद्दल सांगितले नाही.

मात्र, नंतर तिची भिती निघून गेल्यानंतर तिने गौतमने तिला त्याच्या नातेवाईक असलेल्या इतर लोकांकडे वेगवेगळ्या गावी नेवून अत्याचार केल्याचे सांगितले. तर इतरांनी ही गौतम यास सहकार्य केल्याचा आरोप होता.

या प्रकरणात गौतम याच्याविरुद्ध भुसावळ येथील विशेष न्यायाधिश डि. एल. गायकवाड यांच्या न्यायालयात या खटल्याचे सरकारतर्फे पीडितेची आई तसेच पीडितेची तपासणी करणाऱ्या डॉ. नम्रता अच्छा तर जन्म नोंदणी अधिकारी व तपासी अधिकारी पीएसआय आशिष शेळके आदींसह ९ लोकांच्या साक्षी तपासण्यात आल्यात. साक्षी, पुराव्याअंती आरोपी गौतमविरूध्द अत्याचाराचा आरोप सिध्द झाल्याने न्यायालयाने त्यास दोषी धरून ८ रोजी १० वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली.

गौतम यास ठोठावलेल्या शिक्षेत ५ हजार रुपये दंड व दंडापैकी ४ हजार रूपये पीडितेला देण्याचे न्यायालयाने आदेश दिले आहेत. तर उर्वरित सहकार्य करणारे आरोपींविरूध्द दोष सिध्द न झाल्याने त्यांना दोषमुक्त करण्यात आले. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे अॅड. विजय खडसे यांनी कामकाज पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी म्हणून पीएसआय रफिक शेख कालू यांनी सहकार्य केले. या गुन्हयाचा तपास पीएसआय आशिष शेळके यांनी केला होता.





## एरंडोल येथे ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगजनांचे गृहभेटीद्वारे मतदान



एरंडोल :- एरंडोल विधानसभेसाठी दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेचा एक भाग म्हणून जेष्ठ नागरिक व दिव्यांग जनांचे गृहभेटीद्वारे मतदान प्रक्रिया दि. ०८/११/२०२४ रोजी १६ एरंडोल मतदार संघात मतदान केंद्रांवर १७३ मतदारांसाठी पार पाडण्यात आली. गृहमतदानाचे उद्देश- मतदानाची टक्केवारी वाढविणे, वृद्ध व दिव्यांग मतदार मतदानापासून वंचित राहू नयेत. यांसाठी निवडणूक आयोगाने गृहभेटीद्वारे मतदान ही संकल्पना राबविण्याचे ठरविल्याने एरंडोल विधानसभा मतदार संघात निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी .मनिष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्री. प्रदिप पाटील तहसीलदार एरंडोल, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी . उल्हास देवरे तहसीलदार पारोळा, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी . अमोल बागुल मुख्याधिकारी नगरपरिषद एरंडोल तसेच नोडल अधिकारी . विजय अहिरे सहाय्यक गटविकास अधिकारी एरंडोल यांच्या सहकार्याने सदर प्रक्रिया पार पडली. गृहमतदानाची सुविधा प्राप्त झाल्याने ८५+ (वयोवृद्ध) मतदार व दिव्यांग मतदार बंधू भगिनीसाठी मतदानाची सुविधा घरोघरी जाऊन उपलब्ध करून दिली.

सदर प्रयोग अत्यंत चांगल्याप्रकारे यशस्वी झाल्याने वृद्ध व दिव्यांगजनांनी समाधान व्यक्त केले. यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांनी सदर कामगिरी उत्कृष्टरित्या पार पाडली.

## एरंडोल मध्ये ११ वर्षीय मुलगा डेंग्यू संशयित रुग्ण.....!





एरंडोल - येथे पारधी वाड्यात डेंग्यू संशयित रुग्ण आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे.हितेश देविदास पारधी,वय ११ वर्षे हा मुलगा संशयित रुग्ण आहे.जळगांव येथील निरामय हॉस्पिटलच्या अहवालात सदर मुलाला डेंग्यूची लागण झाली असून तो डेंग्यूचा संशयित रुग्ण आहे. असे नमूद केले आहे.दरम्यान शासकीय प्रयोगशाळेचा अहवाल संबंधित यंत्रणां व नगरपालिका प्रशासन यांना प्राप्त झाला नाही असे सांगण्यात आले. एरंडोल न.पा.चे मुख्याधिकारी अमोल बागुल हे विधानसभा निवडणुकीच्या कर्तव्यावर आहेत.बागुल यांनी संशयित रुग्ण आढळून आलेल्या परिसरात फवारणी करण्याची सुचना संबंधित विभागाला दिली आहे.

तसेच शहरातील या भागात डासांची उत्पत्ती होत असल्याने त्या परिसराची साफसफाई करण्याची मोहीम न.पा.तर्फे राबवण्यात येत आहे.शहरात तापाचे रूग्ण आढळून आल्यास त्वरित न.पा.कार्यालय व एरंडोल ग्रामीण रूग्णालय यांच्याशी संपर्क साधून योग्य त्या उपाययोजना व उपचार करून घ्यावेत असे आवाहनही करण्यात आले आहे.

## मतदानासाठी १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य

मुंबई : विधानसभा निवडणूकीसाठी २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार असून मतदान करण्यासाठी, ज्या मतदारांचे मतदार यादीत नाव आहे अशा मतदारांकरिता भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदान करता येणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ज्या मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र आहे, ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. जे मतदार छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करू शकणार नाहीत, अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्रा व्यतिरिक्त १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे.

मतदानावेळी मतदारांना दिलेले निवडणूक ओळखपत्र नसल्यास १२ प्रकारच्या पुराव्यांमध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.

अनिवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे. एखाद्या मतदाराने मतदार यादीतील आपल्या पत्त्यात बदल केला असेल, पण त्याला अद्याप नवे ओळखपत्र मिळाले नसेल तर आधीचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल. मात्र त्या व्यक्तीचे नाव विद्यमान पत्यासह मतदार यादीत असणे आवश्यक आहे. तसेच सर्व नोंदणीकृत मतदारांना मतदान दिनांकाच्या किमान पाच दिवस आधी मतदान केंद्र, यादी भाग क्रमांक, मतदानाची तारीख, वेळ आदी माहितीच्या चिठ्ठ्यांचे निवडणूक कार्यालयाकडून वितरण केले जाईल. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती - चिठ्ठी आणि छायाचित्र ओळखपत्रासोबत घेऊन यावे, असे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# खान्देशातील २५ टक्के मजूर निघाले ऊसतोडीला !

## वेगवेगळ्या साखर कारखान्यांच्या मतदानावर होणार परिणाम; ५२ तांड्याहून होत असते स्थलांतर

चाळीसगाव -यंदा राज्यासह शेजारील कर्नाटक राज्यातील ऊस गाळप हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरू होत आहे. त्यामुळे ६ पासून खान्देशातील पाच लाखांपैकी जवळपास २५ टक्के ऊसतोड मजुरांनी ऊसतोडीसाठी पश्चिम महाराष्ट्राकडे कूच केली आहे. याचा थेट परिणाम २० रोजी विधानसभेसाठी होणाऱ्या मतदानावर होण्याची शक्यता आहे.



राज्यात सर्वाधिक साखर कारखान्यांचे जाळे पश्चिम महाराष्ट्रात असले तरी, ऊसतोड करणारे सर्वाधिक मजूर हे मराठवाडा व खान्देशातील आहेत. एकट्या चाळीसगाव तालुक्यातील बंजारा समाजाच्या ५२ तांड्यांमधून ४० ते ४५ हजार मजूर दरवर्षी ऊसतोडीसाठी जातात. पारोळा,

भडगाव, अमळनेर, धरणगाव या तालुक्यातील मजुरांची संख्याही मोठी आहे. धुळ्यासह नंदुरबार जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांची संख्या अडीच ते तीन लाख असून, जळगाव जिल्ह्यात दोन लाख ऊसतोड मजूर आहेत. ऊसतोड मजूर ऑक्टोबर महिन्यात साखर कारखान्यांच्या परिसरात स्थलांतरित होतात. साधारणतः आठ महिने ऊसतोड चालते. एप्रिलच्या दुसऱ्या

मुकादमांनी मजुरांना ॲडव्हान्स देऊन टाकला आहे. त्यामुळे ऊस- तोडीसाठी निघण्याची मजुरांची तयारी गेल्या तीन ते चार दिवसां- पासून ग्रामीण भागात सुरू आहे. गत दोन दिवसांपासून ऊसतोड मजूर कुटुंबकबिल्यासह कारखा- न्यांकडे जात असल्याचे दिसून येत आहे.

हंगामाला सुरुवात होणार आहे. खान्देशात पाच लाख ऊसतोड मजुरांची संख्या आहे. एकूण पाच लाख मजुरांपैकी २५ टक्के मजूर कारखान्यांकडे निघाले आहेत. उर्वरित मतदान करून ऊसतोडीसाठी जातील. असे - किशोर पाटील - ढोमणेकर अध्यक्ष, खान्देश ऊसतोड व मुकादम संघटना यांना बोलतांना सांगितले.

पंधरवड्यात हे मजूर पुन्हा गावी परत येतात. ऊसतोड मजूर मतदानानंतर ऊसतोडीसाठी जातील. अशी स्थिती सुरुवातीला होती. त्यामुळे खान्देशातील उमेदवारांचा जीव भांड्यात पडला होता. कर्नाटकसह राज्यातही १५ नोव्हेंबरला साखर कारखाने सुरू करण्याचे निर्देश दिले गेले आहेत.

# अखेर सीसीआयकडून कापूस खरेदीला सुरुवात... ८ टक्क्यांपेक्षा कमी आर्द्रतेच्या मालाला मिळणार हमीभाव

जळगाव : यंदा कापसाला खासगी बाजारात चांगला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. अनेक दिवसांपासून सीसीआयकडून कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती. अखेर जिल्ह्यात सीसीआयकडून कापूस खरेदीला सुरुवात झाली असून, शुक्रवारी जळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून सीसीआयचे केंद्र जळगाव शहरात सुरू करण्यात आले आहे.

शिवाजीनगर भागातील शांती एक्झिम येथे हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. शुक्रवारी या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सीसीआयचे केंद्र प्रमुख के.पी. मीना, अंशू प्रिया, बाजार समितीचे सचिव प्रमोद काळे, बाजार अधीक्षक विकास

सीसीआयच्या केंद्रावर माल विक्रीसाठी आणताना हमीभावासाठी काही निकष निश्चित करुन देण्यात आले आहेत. आर्द्रतेचे प्रमाण जर ८ टक्क्यांपेक्षा कमी असेल तर त्या शेतकऱ्यांना ७ हजार ५२१ रुपयांचा हमीभाव देण्यात येणार आहे, तर १२ टक्क्यांपर्यंतची आर्द्रता राहिल्यास त्या शेतकऱ्यांना ७ हजार १२१ रुपयांची रक्कम दिली जाणार आहे. १२ टक्क्यांपेक्षा जास्तीची आर्द्रता राहिल्यास त्यात अजून दर कमी होण्याची शक्यता आहे.सीसीआयकडे माल विक्री करताना शेतकऱ्यांना कापूस पेरा असलेला सात बाराचा उतारा, आधार कार्ड, राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबुक ही कागदपत्रे आवश्यक राहणार आहेत. सूर्यवंशी, पूनमचंद राठोड, जितेंद्र खलसे आदी उपस्थित होते. दरम्यान, जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्येही सीसीआयकडून खरेदी केंद्र सुरू करण्याचीही मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.



# नाशिक शहरातून तीन मुली बेपत्ता

## सरकारवाडा, सातपूर, उपनगर पोलीस ठाण्यात अपहरणाचे गुन्हे दाखल

नाशिक : शहरात अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले असून, वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या तीन मुली नुकत्याच बेपत्ता झाल्या आहेत. या मुलीना कुणीतरी फूस लावून पळवून नेल्याचा संशय कुटुंबीयांनी वर्तविल्याने याप्रकरणी सरकारवाडा, सातपूर व उपनगर पोलीस ठाण्यात अपहरणाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, केटीएचएम परिसरात राहणारी अल्पवयीन मुलगी बेपत्ता आहे.

घर सोडून जात असल्याचे सांगून ती घराबाहेर पडली असून, अद्याप परतलेली नाही. त्यामुळे तिचे कुणीतरी अपहरण केल्याचा अंदाज वर्तविण्यात येत असून, तिच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून सरकारवाडा पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी हवालदार खोडे तपास करीत आहेत.

वसाहतीत घडली. श्रमिकनगर भागात राहणारी अल्पवयीन मुलगी गेल्या बेपत्ता आहे. तिचे कुणीतरी अपहरण केल्याचा आरोप तिच्या बहिणीने केला असून, याबाबत सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सहायक निरीक्षक भडांगे तपास करीत आहेत.

तिसरी घटना नाशिकरोड भागात घडली.

जयभवानी रोड परिसरात राहणारी अल्पवयीन मुलगी सायंकाळी शिखरेवाडी मैदान येथे जात असल्याचे सांगून घराबाहेर पडली, ती अद्याप घरी परतली नाही. सर्वत्र शोध घेऊनही ती मिळून न आल्याने कुटुंबीयानी पोलिसांत धाव घेतली असून, तिला कुणीतरी फूस लावून पळवून नेल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. याबाबत मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहायक निरीक्षक बैसाणे तपास करीत आहेत.

# मागची निवडणूक शांततेत, यंदा एकही संवेदनशील मतदान केंद्र नाही जळगाव जिल्ह्यातील ३,६८३ मतदान केंद्रांवर राहणार पोलिसांचा वॉच'

जळगाव : गेल्या वेळी विधानसभा निवडणुकीदरम्यान मतदान केंद्रांवर निवडणुकीशी संबंधित कोणताही वाद विवाद न झाल्याने यंदा विधानसभा निवडणुकीवेळी जिल्ह्यात एकही संवेदनशील मतदान केंद्र नाही. असे असले तरी जिल्ह्यातील सर्व ३ हजार ६८३ मतदान केंद्रांवर पोलिसांची बारीक नजर राहणार आहे.

निवडणूक म्हटली म्हणजे उमेदवार, कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्याकडून आरोप प्रत्यारोप होत असतात. त्यात मतदानाच्या दिवशी बोगस मतदान, इव्हीएम मशिनविषयी असलेल्या तक्रारी यावरून वाद होतात. मात्र, गेल्या वेळी सन २०१९मधील विधानसभा निवडणुकीदरम्यान निवडणुकीशी संबंधित कोणत्याही कारणावरून मतदान केंद्रांवर वाद झाले नाहीत.

**सहा तुकड्या दाखल**

विधानसभा निवडणुकीद- रम्यान बंदोबस्तासाठी केंद्रीय पोलिस दलाच्या तुकड्या दाखल होऊ लागल्या आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात सहा तुकड्या दाखल झाल्या असून, १० व ११ नोव्हेंबर- पर्यंत अजून सहा तुकड्या दाखल होणार आहेत. यामध्ये केंद्रीय सुरक्षा बलासह केंद्राच्या विविध तुकड्यांचा समावेश आहे.



**कोठेही हयगय नाही**

जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदानसंघात असलेल्या एकूण ३ हजार ६८३ मतदान केंद्रांपैकी एकही संवेदनशील केंद्र नसले तरी पोलिसांचे प्रत्येक मतदान केंद्रांवर बारीक लक्ष राहणार आहे. गेल्या निवडणुकीप्रमाणे या वेळीदेखील कोणत्याही वादविवादाशिवाय निवडणूक पार पडावी म्हणून तगडा पोलिस बंदोबस्त राहणार आहे. कोठेही काहीही गैरप्रकार होताना दिसल्यास कारवाईबाबत हयगय केली जाणार नसल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपद्रवींना आळा बसावा म्हणून त्यांच्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे.

यामध्ये २ हजार ८९५ जणांवर वेगवेगळ्या कलमांखाली प्रतिबं- धात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच दारुबंदी कायद्यानुसार ३०१ जणांवर कारवाई करीत ३५ जणांच्या हद्दपारीचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यापैकी सात प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे, तसेच तीन जणांवर एमपीडीएअंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली.